# प्रसिध्दी निवेदन

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा NTS (राज्यस्तर) इ. १० वी साठी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत ०४ नोव्हेंबर २०१८ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इ. १० वी साठी राज्यस्तर परीक्षेची **सुधारित निवडयादी मंगळवार दिनांक १९/०३/२०१९ रोजी सायं. ५.०० वाजता** जाहीर होणार आहे.

**NTS** इ. १० वी परीक्षेसाठी राज्यातून ८६२८१ विद्यार्थी नोंदविण्यात आले. **NTS** राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यातून ३८७ विद्यार्थी कोटा एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली यांचेकडून निश्चित केला होतो. त्यानुसार दि. ०१.०३.२०१९ रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी ३८७ विद्यार्थ्यांची निवडयादी जाहीर करण्यात आलेली होती.

तथापि महाराष्ट्रासाठी सन २०१८-१९ व सन २०१९-२० साठी सुधारित कोटा एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली यांचेकडून ७७४ विद्यार्थी इतका देण्यात आलेला आहे. त्यामध्ये सर्वसाधरण गटातील (General) ३९१, OBC संवर्गातील २०९, अनुसूचित जाती (SC) ११६ व अनुसूचित जमाती (ST) ५८ अशा एकूण ७७४ विद्यार्थ्यांचा कोटा देण्यात आलेला आहे. संबंधित संवर्गातील समान गुणांचे विद्यार्थी समाविष्ट करुन ७७५ विद्यार्थ्यांची निवड यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच संबंधित संवर्गात अपंगासाठीचे ४% आरक्षण समाविष्ट आहे. ज्या विद्यार्थ्यांची निवड जात/अपंगत्व आरक्षणातून झालेली आहे त्यांनी सदरचे प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रवेशपत्रासोबत एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली यांना सादर केल्याशिवाय त्यांची निवड कायम समजण्यात येणार नाही. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची **राष्ट्रीयस्तर परीक्षा लोकसभा निवडणूक कामकाजामुळे रविवार दिनांक १२ मे २०१९ ऐवजी रविवार दि. १६ जून २०१९ रोजी होणार आहे. संबंधित निवड यादीतील विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे एप्रिल २०१९ ऐवजी मे २०१९ च्या पहिल्या/दुसऱ्या आठवडयात NCERT नवी दिल्ली यांच्या www.ncert.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. ही सुधारित निवडयादी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व http://nts.msceScholarshipexam.in वेबसाईटवर मंगळवार दिनांक १९/०३/२०१९ रोजी सायं. ५.०० वाजल्यापासून पाहता येईल.**

आयुक्त,<br>
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,<br>
पुणे -१ करिता.

दि. १९.०३.२०१९

E:\NTS NMMS EXAM 2018-19\NTS Result\Result decler\pressnote